वाचले:- १)महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम १०(१)

२) मा.आयुक्त, यांचेकडील अधिकार प्रदान आदेश प्रशा/२/कावि/४४७/२०१५ दि.२०/१०/१५

३) मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय निगडी यांच्याकडील दि.२०/१२/२०२१ चे पत्र

४)दि.०६/०१/२०२२चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/कावि/८४७/२०२२
दि.०६/०१/२०२२

विषय –नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत.

**श्री.सुरेश यशवंतराव बुधकर (मुख्याध्यापक)**

सं.क्र.५९००

आदेश,

श्री.सुरेश यशवंतराव बुधकर (मुख्याध्यापक) हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहाय्यक शिक्षक या पदावर दि.०६/०२/१९९१ रोजी माध्यमिक शिक्षण विभागात रूजू झालेले आहेत. श्री.सुरेश यशवंतराव बुधकर (मुख्याध्यापक)यांची जन्म तारीख ०१/०२/१९६४ अशी असून त्यांच्या वयास दिनांक-३१/०१/२०२२ रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने श्री.सुरेश यशवंतराव बुधकर (मुख्याध्यापक) यांना ३१/०१/२०२२ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १० (१) नुसार गट क मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्ष पूर्ण होतील,त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्री.सुरेश यशवंतराव बुधकर (मुख्याध्यापक) यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही.तसेच श्री.सुरेश यशवंतराव बुधकर (मुख्याध्यापक) यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज,घरबांधणीकर्ज,वाहनकर्ज,संगणक कर्ज,घरदुरूस्ती कर्ज,वैद्यकीय अग्रीम,कामगार कल्याण कर्ज तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही.तसेच इतर कोणत्याही प्रकारचे येणे बाकी नसलेबाबतचे दाखले विद्यालयाने सादर केले आहेत.भविष्यात इतर काही रक्कम येणे बाकी निघाल्यास सदर रक्कम श्री.सुरेश यशवंतराव बुधकर (मुख्याध्यापक) यांना मनपा कोषागरात भरणे बंधनकारक राहील.तसेच त्यांना सेवासात्यत देण्यात आलेले नाही.

सबब,मी उप आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८ उपरोक्त वाचले क्र.०२ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन )नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये श्री.सुरेश यशवंतराव बुधकर (मुख्याध्यापक) यांना **दिनांक - ३१/०१/२०२२ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.**

प्रस्तूत आदेशाची सविस्तर नोंद श्री.सुरेश यशवंतराव बुधकर (मुख्याध्यापक) यांचे मूळ सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

(संदिप खोत)
उप आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,

श्री.सुरेश यशवंतराव वुधकर (मुख्याध्यापक)

माध्यमिक विद्यालय निगडी

प्रत:- १) लेखा शाखा

२)प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन)

सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग

३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४

४) माध्यमिक विद्यालय निगडी

२/- पुढील कार्यवाहीसाठी

(रोहिणी शिंदे)
प्रशासन अधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.